नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/१२/२०२५ (सोमवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५— मतमोजणी प्रक्रिया आणि विजय मिरवणुका बंदोबस्त यशस्वी रित्या पार पडला

दिनांक २१/१२/२०२५ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील १३ पोलीस स्टेशन अंतर्गत सावनेर, कळमेश्वर, मोहपा, खापा, काटोल, नरखेड, कन्हान पिपरी, उमरेड, रामटेक, बोरी अशा एकुण ११ नगर परिषद तसेच मोवाड, कोंढाळी, कांद्री, मौदा, भिवापूर, पारशिवनी अशा एकुण ०५ नगरपंचायत बाबत मतमोजणी प्रक्रिया पार पाडली.

मतमोजणी प्रक्रियेचा संपूर्ण बंदोबस्त अत्यंत शांततेने आणि यशस्वीरित्या पार पडला. नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्रांवर सुयोग्य पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. सदर बंदोबस्तात उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह १६ पोलीस निरीक्षक, ४९ सपोनि/पोउपनि, ४४१ पोलीस अंमलदार, ४८ वाहतुक पोलीस अंमलदार ७०० गृहरक्षक ,तसेच राज्य राखीव दलाचे ३ कंपनी, दंगा नियंत्रण पथक —०२ , जलद प्रतिसाद पथक (क्यु आर टी) पथक —०२ आणि या व्यतिरिक्त अधिक १० पथके नेमण्यात आली होती.

**मतमोजणी नंतर पार पडलेल्या विजय मिरवणुकांदरम्यान शांतता राखण्यासाठी योग्य बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. बंदोबस्तात नेमलेल्या सर्व पोलीस अधिकारी आणि**

**अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोर पणे पार पाडुन कोणत्याही प्रकारची अनुचित घटना किंवा कायदा व सुव्यवस्था धोक्यात येणारी परिस्थिती घडु न दिल्याने एकही गुन्हा नोंद न होता सदर बंदोबस्त शांततेत आणि यशस्वीरित्या पार पडला.**

बंदोबस्तातील प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष रित्या सहभागी असलेल्या सर्व पोलीस अधिकारी/ अंमलदाराचे मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी अभिनंदन केले.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद ६ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २१/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू,विदेशी दारू, मोहाफुल दारू तसेच मोहाफुल सडवा असा एकुण ६,२६,०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एकुण १० गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण ०१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ०१ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ७२९० मिली देशी दारु,३६० मिली विदेशी दारू, १५६०० लिटर मोहाफुल सडवा, ४६५ लिटर मोहाफुल दारू आणि इतर साहित्या असा एकुण**

**६,२६,०२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

**स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक २०/१२/२५ रोजी बुटीबोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना २१/०० वा. ते २१/३० वाजेच्या दरम्यान आरोपी नामे राजेश श्रीकृष्ण नेहारे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र ०४ जलालखेडा, ता. नरखेड, जि.नागपुर ह.मु. भारकस, ता. हिंगणा, जि. नागपुर हा बुटीबोरी ते चंद्रपुर रोडवरील रुईखेरी शिवारातील वाय पॉईंट जवळील पुलाखालील सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**